पुढील उतारा वाचा आणि योग्य तो पर्याय निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

मराठवाड्याला सातवाहन, यादवांच्या प्राचीन राजवटींपासून ते मध्ययुगीन मुस्लीम सत्ताधीशांपर्यंत मोठा गौरवशाली इतिहास आहे. शेकडो वर्षांच्या या इतिहासाने या भूमीत संस्कृतीचे अनेक पदर विणले आहेत, पण पुढे स्वातंत्र्यानंतर हे सारेच जग उपेक्षित बनले होते. या उपेक्षेनेच डॉ. पुरवारांना अस्वस्थ केले होते.

अनेक ऐतिहासिक कलाकृती दुर्दशेचे जीवन जगत होत्या. काही नष्ट होत होत्या, तर काहींची चक्क छुपी विक्री सुरू होती.

कानी येणाऱ्या या प्रत्येक अत्याचाराचे घाव त्यांच्या संवेदनशील मनावर होत होते. आपल्या या गौरवशाली कला-संस्कृतीचे वेळीच जतन व्हावे, त्यांना आश्रय-सुरक्षा आणि प्रेम मिळावे या विचारांनीच डॉ. पुरवारांना झपाटले. यासाठी सुरुवातीला त्यांनी शासनाशी पत्रव्यवहार केला, पण त्यांनी अपुऱ्या यंत्रणेचे कारण देत हात वर केले. मग अन्य संस्था-व्यक्तींना त्यांनी हाक दिली, पण त्यांनीही त्यांच्या मर्यादा उघड केल्या. शेवटी न राहवून पुरवारांनी स्वतःच या उपेक्षित वस्तूंचे पालकत्व घेण्यास सुरुवात केली आणि यातूनच औरंगाबादेत एक नवा इतिहास जन्माला आला.

चाळीस वर्षे या एकट्या माणसाने तन-मन-धनाने आपले सारे आयुष्य पणाला लावत, गावोगाव भटकत तब्बल वीस हजार ऐतिहासिक कलाकृतींचा संग्रह केला. कधी त्याचे महत्त्व सांगत, कधी प्रेमाने तर कधी स्वतःचा खिसा रिकामा करीत ! अगदी अश्मयुगातील दगडी हत्यारांपासून ते अगदी काल-परवाच्या ब्रिटिश कागदपत्रे-नकाशांपर्यंत..... जे जे काही नष्ट होतेय, बाहेर विकले जातेय अशा प्रत्येक कलाकृतीला या माणसाने स्वतःच्या घराचा आसरा दिला. घराचाच एक मोठा भाग रिकामा करीत त्यांनी इथे संग्रहालय थाटले. ही सारी दालने असंख्य ऐतिहासिक वस्तूंनी भरलेली आहेत. काय नाही यात, पुरातत्त्व ते इतिहासापर्यंत आणि कला साहित्यापासून ते शस्त्र-व्यापारांपर्यंत अशा अनेक विषयांना कवेत घेणाऱ्या वस्तू इथे आहेत. अश्मयुगीन हत्यारे, प्राचीन शिल्पं, खेळणी, शस्त्रे, नाणी, मुद्रा, हस्तलिखिते, चित्रे, वस्त्रालंकार, भांडी, दैनंदिन वापरातील वस्तू असा हा हजारो कलाकृतींचा जणू खजिनाच आहे. जणू मानवाच्या आदिम सत्यापासून ते भारताच्या गौरवशाली इतिहास-कलेचे हे सांगाती !

डॉ. पुरवारांबरोबर या वस्तू पाहू लागलो, की या साऱ्याच वस्तू गळ्यात जीव आणून त्यांच्याबद्दल बोलू लागायच्या. हे लाखो वर्षांपूर्वीचे जीवाश्म, कुठल्या नदीपात्रात कसे सापडले. हे सातवाहन मातीचे दागिने दिवस-दिवसभर ऊन खात वाळूउपशावर लक्ष ठेवत कसे गोळा केले, भंगार मोडीची दुकाने पालथी घालत मूर्ती-शिल्पांपासून दैनंदिन वस्तूंपर्यंत काय काय मिळवले, अशा अनेक सुरस कथा बाहेर यायच्या.

डॉ. पुरवारांनी केवळ वस्तू गोळा केल्या नाहीत तर त्या त्या वस्तूंच्या इतिहास संस्कृतीचाही शोध घेतला. सातवाहनांच्या कुठल्या राजाच्या नाण्यावर हत्तीची प्रतिमा आहे, पैठणीमध्ये सोन्याची जर कशी विणली जायची आणि दांडपट्ट्यासारखे हत्यार कसे चालवायचे, या साऱ्याच गोष्टींची माहिती ते आत्मीयतेने द्यायचे.

130. डॉ. पुरवारांनी ऐतिहासिक कलाकृतींचा संग्रह केला कारण

(1) कलासंस्कृतीचे जतन व्हावे अशी त्यांना तळमळ होती.

(2) या कलाकृती त्यांना स्वतःला हव्या होत्या.

(3) या कलाकृतींचा ते व्यापार करणार होते.

(4) त्यांना इतिहास आवडत होता.

We are providing a piece of information. This may not be an Official One. This might be useful for refe

131. पुरवारांचे संग्रह करण्याचे काम किती वर्षे चालू होते ?

(1) 50

(2) 20

(3) 40

(4) 10

132. पुरवारांसाठी कोणता शब्द सर्वाधिक समर्पक आहे ?

(1) सामान्य संग्राहक

(2) इतिहासलेखक

(3) कलावंत

(4) संस्कृतिरक्षक

133. सांगाती म्हणजे काय ?

(1) सांगणारा

(2) सवंगडी

(3) सुसंगती

(4) सोबती

134. पुरवारांच्या कार्याचे योगदान कोणत्या क्षेत्रांना आहे ?

(1) भूगोल, कला, इतिहास

(2) भौतिकशास्त्र, इतिहास, पुरातत्त्व

(3) इतिहास, पुरातत्त्व, कला

(4) इतिहास, साहित्य, भूशास्त्र

135. 'सुरस' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) सुरेल

(2) रसाळ

(3) रसरशीत

(4) नीरस

136. विद्यार्थ्यांच्या श्रवणकौशल्याच्या विकासाला चालना देण्यासाठी प्राथमिक शिक्षक खालील गोष्टींपैकी काय करू शकतो ?

(1) दैनंदिन वेळापत्रकात विशिष्ट श्रवणकृतींचा नित्याचा घटक म्हणून समावेश करणे.

(2) शिक्षकाने नुकतेच जे म्हटलेले असेल ते एकेका विद्यार्थ्याला म्हणायला सांगताना मधून मधून थांबणे.

(3) विद्यार्थी बोलत असताना लक्षपूर्वक ऐकणे.

(4) विद्यार्थी जे ऐकत आहेत त्याविषयी सखोल विचार करण्याची त्यांना वारंवार आठवण करून देणे.

137. एका शिक्षिकेच्या वर्गात वेगवेगळ्या भाषिक पार्श्वभूमीचे विद्यार्थी आहेत. त्यांना अधिक मदत व्हावी म्हणून ती अनेकवेळा शाब्दिक देवाणघेवाणीबरोबर साध्या वाक्यातील शब्दावयवांच्या जागी टाळ्या वाजवून शारीरिक हालचालीही करते. तिच्या या पद्धतीचा रोख प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या कौशल्यावर आहे ?

(1) लय

(2) भाषावापरशास्त्र (pragmatics)

(3) ध्वनिशास्त्राबद्दलची सजगता

(4) वाक्यव्यवस्था

We are providing a piece of information. This may not be an Official One. T

**138.** एकमेकांना समजून घेणे व एकमेकांबरोबर वैचारिक देवाणघेवाण परिणामकारकरीत्या साधणे हा बुद्धिमत्तेचा कोणता प्रकार आहे ?

(1) अवकाशिक

(2) भाषिक

(3) आंतरव्यक्तीय (interpersonal)

(4) अंतरव्यक्तीय (intrapersonal)

**139.** विद्यार्थ्यांच्या चुकीच्या प्रतिसादावर शिक्षक सकारात्मक पुनर्दृढीकरणातून (reinforcement) उत्तर देतात. यातून शिक्षकाचे कोणत्या गोष्टीचे आकलन दिसून येते ?

(1) विद्यार्थ्यांची नकारात्मक भावनिक प्रतिक्रिया समजणे.

(2) भाषिक विकासाला चालना देणे.

(3) अध्ययनाच्या विविध पद्धतींचा समावेश करणे.

(4) बोधनात्मक विकासाला गती देणे.

**140.** जर विद्यार्थ्यांची शिक्षणात सहभागी होण्याची आणि त्यातून लाभ घेण्याची क्षमता, दीर्घकालीन शारीरिक, ऐंद्रीय, मानसिक अनारोग्य किंवा अध्ययनातील अक्षमता यामुळे मर्यादित असेल तर त्यावर पुढीलपैकी कशाची निवड करावी ?

(1) उपायात्मक योजना

(2) वर्गाचे व्यवस्थापन

(3) मानव्यविद्याधिष्ठित शिक्षण

(4) विशिष्ट गरजांवर आधारित शिक्षण

**141.** मूल्यमापनाचा निकष म्हणजे

(1) मूल्यमापनाचे मार्गदर्शक सूत्र

(2) गुणांची प्रश्ननिहाय वाटणी

(3) विद्यार्थ्यांच्या क्षमतेबद्दलचे सर्वसाधारण मत

(4) मूल्यमापनाचे साधन

**142.** पुढीलपैकी कोणत्या वाक्यातील दोन शब्दांचे लिंग एकसारखे आहे ?

(1) नावात काय आहे ? नावेत बैस.

(2) पन्नासावे पान उघड. पान खाणार का ?

(3) तुझ्या येण्याची वेळ काय आहे ?
किती वेळ फुकट घालवलास ?

(4) बर्फाचा गोळा खाऊ नकोस.
काश्मीरमध्ये बर्फ पडत आहे.

**143.** ज्ञानरचनावादाच्या सिद्धांतात (constructivism)

(1) विद्यार्थी त्यांचे स्वत:चे जगाचे आकलन आणि ज्ञान घेतलेल्या अनुभवातून आणि त्या अनुभवांवर चिंतन करून साध्य करतात.

(2) भिन्न नमुन्यांच्या विविधतेचा अभ्यास करून दृढ पायावर आधारित निष्कर्ष काढतात.

(3) विद्यार्थ्यांना शिक्षकाची मदत मिळते आणि ते स्वत:च्या सिद्धान्ताचे संशोधन व निर्मिती करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करतात.

(4) स्वत:ची अध्ययन साधने तयार करून प्रत्यक्षानुभव मिळवतात.

**144.** संदेशाचे, ध्वनी, शब्दांच्या जाती, रूपव्यवस्थेतील फरक असे विशिष्ट पैलू ओळखून किंवा त्यांच्यामधील फरक लक्षात घेऊन केलेली कृती म्हणजे

(1) वाचन

(2) लेखन

(3) श्रवण

(4) भाषण

We are providing a piece of information. This may not be an Official One. Th

145. विषयकेंद्री पद्धतीत अध्ययनानुभव कशाभोवती संघटित केले जातात ?

(1) विद्यार्थ्यांना विषयात वाटणारा रस

(2) अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेल्या गोष्टी

(3) शिक्षकाचे विषयावरचे प्रभुत्व

(4) शैक्षणिक तंत्रज्ञान

146. उपजत प्रतिभेची सर्वोत्तम लक्षणे खालील पैकी कोणत्या गोष्टींवरून मिळतात ?

(1) बुद्ध्यांक चाचणी

(2) भावनिक बुद्ध्यांक चाचणी

(3) शिक्षक आणि पालक

(4) शाळेतील संचयी नोंदपत्रक

147. एक माध्यमिक शिक्षक, अनेक भाषांचे ज्ञान आवश्यक असणाऱ्या करिअरवर भर देण्यासाठी आपल्या शैक्षणिक सामग्रीत बहुराष्ट्रीय संघटनांच्या बातम्या आणि नियतकालिका तील लेखांचा नियमितपणे समावेश करतो. अशा सामग्रीच्या वापरातून विद्यार्थ्यांना कशासाठी मदत होते ?

(1) द्विभाषिक समाजगटाची आणि भाषिक संपर्क जाळ्याची (network) विविध प्रकारची वैशिष्ट्ये ओळखण्यासाठी

(2) लोकांना दुसऱ्या देशांमध्ये स्थलांतर करायला भाग पाडणारी परिस्थिती समजून घेण्यासाठी.

(3) जागतिक समाजात द्विभाषिक असण्याचे फायदे ओळखण्यासाठी

(4) मोठे झाल्यावर त्यांना कुठे राहायला आणि काम करायला आवडेल ते समजण्यासाठी.

148. श्रवण भाषणाच्या चाचणीत पुढील संवादाचे मूल्यमापन कसे कराल ?

| | |
|---|---|
| शिक्षक | दिल्लीचा पारा इतका वर कसा काय ? |
| विद्यार्थी 1 | प्रदूषण वाढल्यामुळे |
| विद्यार्थी 2 | माझासुद्धा. पारा वर आहे आज. |

(1) विद्यार्थी 1 चुकीचा प्रतिसाद
विद्यार्थी 2 बरोबर प्रतिसाद

(2) विद्यार्थी 1 बरोबर प्रतिसाद
विद्यार्थी 2 चुकीचा प्रतिसाद

(3) विद्यार्थी 1 चुकीचा प्रतिसाद
विद्यार्थी 2 चुकीचा प्रतिसाद

(4) विद्यार्थी 1 बरोबर प्रतिसाद
विद्यार्थी 2 बरोबर प्रतिसाद

149. उताऱ्यातील शब्दाचे 'मूल्य' म्हणजे

(1) विशिष्ट संदर्भात शब्दाचा अप्रत्यक्ष वापर

(2) शब्दाच्या वापराच्या अनेक पद्धती

(3) शब्दाचा कोशातील अर्थ

(4) विशिष्ट संदर्भात त्या शब्दाची अर्थपूर्णता

150. पुढीलपैकी कोणत्या प्रकारच्या भाषाअध्यापनात विद्यार्थ्यांच्या अस्सल आणि अर्थपूर्ण वैचारिक देवाणघेवाणीवर भर दिला जातो ?

(1) व्याकरण भाषांतर

(2) द्विभाषिक

(3) संज्ञापनात्मक

(4) अनौपचारिक

We are providing a piece of information. This may not be an Official One. Th

SPACE FOR ROUGH WORK

We are providing a piece of information. This may not be an Official One.

SPACE FOR ROUGH WORK

We are providing a piece of information. This may not be an Official Or

SPACE FOR ROUGH WORK

We are providing a piece of information. This may not be an Official One. T

खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :

1. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

2. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

3. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

4. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

5. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.

6. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

7. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

8. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.

9. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

10. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

11. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

12. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. *चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

We are providing a piece of information. This may not be an Official One. Th

**READ CAREFULLY THE FOLLOWING INSTRUCTIONS :**

1. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with Blue/Black Ball Point Pen on Side-2 of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
2. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
3. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
4. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
5. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
6. Each candidate must show on demand his / her Admission Card to the Invigilator.
7. No candidate, without special permission of the Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
8. The candidates should not leave the Examination Hall without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet a second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case.
9. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
10. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
11. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
12. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room / Hall. *The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

**निम्नलिखित निर्देश ध्यान से पढ़ें :**

1. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के पृष्ठ-2 पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह नीले/काले बॉल पॉइन्ट पेन से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
2. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
3. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
4. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
5. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश कार्ड के सिवाय किसी प्रकार की पाठ्य सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
6. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-कार्ड दिखाएँ ।
7. अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
8. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा ।
9. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
10. परीक्षा-हॉल में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
11. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
12. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष / हॉल छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें । *परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।***

SEAL

We are providing a piece of information. This may not be an Official One. This

This booklet contains 20 pages.
इस पुस्तिका में 20 पृष्ठ हैं ।

# JP-2-11

**PAPER II / प्रश्न-पत्र II**
**Marathi Language Supplement**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**PART IV & V / भाग IV & V**

Test Booklet Code
परीक्षा पुस्तिका संकेत

**P**

Test Booklet No.
परीक्षा पुस्तिका संख्या

**552153**

**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20)पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**

**For instructions in Marathi see Page 2 of this Booklet. / मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें ।**

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II OR III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue / Black Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **P**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has two Parts, IV and V, consisting of 60 Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language I - (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language II - (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part -V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो या तो भाग IV (भाषा I) या भाग V (भाषा II) मराठी भाषा में देना चाहते हैं, लेकिन दोनों नहीं ।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II या III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए केवल नीले/काले बॉल पॉइंट पेन का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का संकेत है P । यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के पृष्ठ-2 एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में दो भाग IV और V हैं, जिनमें 60 वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा I - (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा II - (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए ।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

SEAL

Name of the Candidate (in Capitals) : ______________________
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) :
Roll Number : in figures ______________________
अनुक्रमांक : (अंकों में)
: in words ______________________
: (शब्दों में)
Centre of Examination (in Capitals) : ______________________
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) :
Candidate's Signature : ______________ Invigilator's Signature : ______________
परीक्षार्थी के हस्ताक्षर : निरीक्षक के हस्ताक्षर :
Facsimile signature stamp of
Centre Superintendent ______________________

P P

We are providing a piece of information. This may not be an Official One. Thi

ही पुस्तिका 20 पृष्ठ आहे.

# JP-2-11

**प्रश्नपत्रिका II**
**मराठी भाषा पुरवणी**
**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**P**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड** P आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल त. परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग IV : भाषा I – (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग V : भाषा II – (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग IV मध्ये भाषा I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग V मध्ये भाषा II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा I व/वा भाषा II साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग V (भाषा II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of

Centre Superintendent ______________________

We are providing a piece of information. This may not be an Official One. Th

परीक्षार्थींनी जर **भाषा** – I चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

We are providing a piece of information. This may not be an Official One. Th

## भाग – IV
## भाषा – I
## मराठी

पुढील उतारा वाचा आणि योग्य पर्याय निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

कृष्णाकाठावर उभे राहिल्यानंतर स्वच्छ जीवनाचा तो प्रशांत प्रवाह आणि तीरांवरील हिरवागार सुंदर निसर्ग पाहत राहणे याचा आनंद काही वेगळाच. अंतःकरणात तो बसून राहतो आणि स्मरणमात्रे अंतश्चक्षूंसमोर उभा राहतो. लहानपणापासूनच कृष्णाकाठचे प्रेम माझ्या मनात भरून राहिले आहे.

दहा-बारा वर्षांचा असेन मी. असाच एकदा वाईच्या खोऱ्यात असलेल्या मेणवली गावी गेलो होतो. मेणवलीला नाना फडणविसांचा टोलेजंग वाडा आहे. तो मी पाहिला. पण मेणवलीच्या कृष्णाकाठावर, कृष्णेच्या घाटाचे शिल्प मोठे सुंदर आहे, कलापूर्ण आहे. या घाटावर उभे राहिले की, कृष्णामाईचे लांबच लांब पात्र दिसते आणि महाबळेश्वर सोडून निघाल्यानंतर ज्या डोंगर-दऱ्यांतून कृष्णामाई झेपावत पुढे येते, ते खोरे समोर उभे दिसते. नितांतसुंदर, रम्य उसे हे ठिकाण. माझ्या ते चांगलेच लक्षात राहिलेय.

महाबळेश्वरात एकाच ठिकाणाहून पाच नद्या उगम पावतात आणि डोंगरातून वेगवेगळ्या अंगांनी वाटा काढीत, सपाटीवरून धावताना दिसतात. या पाच भगिनींचे एकमेकींवरचे प्रेम मोठे अमर्याद. जन्माच्या ठिकाणी त्या आपले आगळे अस्तित्व दाखवतात, पण ते क्षणभरच. फुगडीचा फेर त्यांनी धरला आहे, असे दिसावे, तोच त्या एकजीव होऊन जातात आणि गोमुखातून बाहेर उडी घेतात. उडी घेताना यांतील कृष्णा कोणती, वेण्णा कोणती, कोयना कोणती किंवा भागीरथी, सरस्वती कोणती, हे ओळखता येत नाही. दिसते, ती एक धार. गोमुखांतून ही स्वच्छ धार कुंडात उडी घेते आणि पुन्हा जमिनीच्या खालून वाटा काढीत पाच बाजूंनी पाच भगिनी निघून जातात. पुढे कुठेतरी मग डोंगरावरून खाली उडी घेताना दिसतात. भागीरथी आणि सरस्वती गुप्त मार्गाने वाहत राहूनच आपल्या मोठ्या बहिणीला रस्त्यात कोठेतरी भेटतात, अशी आख्यायिका आहे. परंतु एक गोष्ट मात्र खरी, उगमापासून काही मैलाच्या अंतरावरच पाचही भगिनींचा मिलाफ होतो आणि कराडपासून पुढे या सर्वजणी कृष्णामय बनूनच सागराला भेटायला जातात. जरा थोराड अंगाची कोयना कराडला आपल्या भगिनीला, कृष्णामाईला कडकडून भेटते. संगमावर मग आनंदाचा कल्लोळ होतो. या ठिकाणी पोहोचलेल्या या सर्व जणींचे पंचामृत मोठ्या पात्रात साठते आणि चविष्ट, सुगंधित बनून पांथस्थांची तहान शमविण्यासाठी पुढे आणि पुढेच, महाराष्ट्र ओलांडून आंध्रात पोहोचते. पाचही भगिनींचे सागराशी मग एकाच वेळी मीलन होऊन जाते.

संबंध कृष्णाकाठ हा एक माझ्या प्रेमाचा, आवडीचा विषय आहे. महाबळेश्वरातल्या, उगमापासून निघून कृष्णेच्या काठाकाठाने थेट राजमहेंद्रीपर्यंत. तिच्या मुखापर्यंत जावे, असे माझे फार दिवसांचे स्वप्न आहे. बदलत्या पात्राची भव्यता पाहावी, निसर्गशोभा मनात साठवावी, गावोगावच्या लोकांना भेटावे, त्यांच्या चालीरीती पाहाव्यात, पिके डवरलेली शेती पाहावी, असे सारखे मनात येत असे. अजूनही येत राहते. श्रावणसरी कोसळू लागल्या की, कृष्णामाईची याद मनात हटकून येते.

91. लेखकाचे अनेक दिवसांपासूनचे स्वप्न कोणते आहे ?
(1) महाबळेश्वरमध्ये राहावे
(2) पिके डवरलेली शेती पाहावी
(3) कृष्णा नदीच्या मुखापर्यंत जावे
(4) गावोगावच्या लोकांना भेटावे

92. लेखकाला कृष्णामाईची आठवण केव्हा येते ?
(1) श्रावणसरी कोसळू लागल्यावर
(2) कराडला गेल्यावर
(3) महाबळेश्वरला गेल्यावर
(4) मेणवलीला गेल्यावर

We are providing a piece of information. This may not be an Official One. This might be useful for referen

93. 'घाटाचे शिल्प मोठे सुंदर आहे' हे वाक्य उद्गारवाचक करा

(1) घाटाचे शिल्प किती सुंदर आहे ।

(2) घाटाचे शिल्प फार सुंदर आहे ।

(3) घाटाचे शिल्प सुंदरच आहे

(4) घाटाचे शिल्प सुंदर आहे का ?

94. पाच नद्या आपले आगळे अस्तित्व कोठे दाखवतात ?

(1) समुद्राला मिळताना

(2) कृष्णा नदीला मिळताना

(3) मोठया पात्रात साठल्यावर

(4) जन्माच्या ठिकाणी

95. 'फुगडीचा फेर धरला आहे' या वाक्यात कोणता अलंकार आहे ?

(1) रूपक

(2) अनुप्रास

(3) चेतनागुणोक्ती

(4) उपमा

96. कडकडून भेटणे म्हणजे

(1) कडकड आवाज करत भेटणे

(2) काकडत असताना भेटणे

(3) कडेकडेने जाऊन भेटणे

(4) आवेगाने भेटणे

97. 'चालीरीती' या शब्दाचा अर्थ

(1) चालण्याची रीत

(2) रीतीरिवाज

(3) गाण्याच्या चाली

(4) रीतसर चालणे

98. कराडला कृष्णामाईला कोणती नदी मिळते ?

(1) वेण्णा

(2) कोयना

(3) सरस्वती

(4) भागीरथी

99. 'पांथस्थ' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) गृहस्थ

(2) पक्षी

(3) पथ

(4) वाटसरू

पुढील कविता वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा :

पंथ जात धर्म किंवा
ते जाणतात एक
हृदयात जागणाऱ्या
तुटतील ना कधीही

नातेहि ज्या न ठावे
प्रेमास प्रेम द्यावे
अतिगूढ संभ्रमाचे
हे बंध रेशमाचे !

विसरून जाय जेव्हा
जाळीत ये जगाला
पुसतात डाग तेही
तुटतील ना कधीही

माणूस माणसाला
विक्राळ एक ज्वाळा
धर्मांध आक्रमाचे
हे बंध रेशमाचे !

क्षण एक पेटणारे
देहाहुनी निराळी
तीर्थाहुनी निराळे
तुटतील ना कधीही

हे युद्धवेड आहे
रक्तास ओढ आहे
पावित्र्य संगमाचे
हे बंध रेशमाचे !

हे बंध रेशमाचे
धागा अतूट हाच
बळ हेच दुर्बलांना
तुटतील ना कधीही

ठेवी जपून जीवा
प्राणांत गुंतवावा
देती पराक्रमाचे
हे बंध रेशमाचे !

100. एक क्षण पेटणारे वेड कसले आहे ?

(1) संपत्तीचे

(2) पावित्र्याचे

(3) लढाईचे

(4) संगमाचे

We are providing a piece of information. This may not be an Official One.

101. 'धर्मांध' म्हणजे

(1) धर्मवेडाने हिंसा करणारे

(2) धर्माचे पालन करणारे

(3) धर्मावर निष्ठा असणारे

(4) धार्मिक वृत्ती असणारे

102. 'ते प्रेम जाणतात' या वाक्याचा पूर्ण भूतकाळ कसा होईल ?

(1) त्यांनी प्रेम जाणले

(2) ते प्रेम जाणतील

(3) त्यांनी प्रेम जाणले होते

(4) ते प्रेम जाणत होते

103. 'माणूस माणसाला विसरून जाय' म्हणजे काय ?

(1) माणूस माणुसकी विसरतो

(2) माणसाची स्मरणशक्ती कमी होते

(3) माणूस नातेवाइकांनाही ओळखू शकत नाही

(4) माणसाच्या डोक्यावर परिणाम होतो

104. 'प्रेम दुर्बलांना पराक्रमाचे बळ देते' म्हणजे काय ?

(1) प्रेम दुबळ्या लोकांना हिंसक बनवते

(2) प्रेम दुबळ्या लोकांना साहसाची प्रेरणा देते

(3) प्रेम दुबळ्या लोकांना लढाई करायला लावते

(4) प्रेम दुबळ्या लोकांना सैन्यात भरती व्हायला लावते

105. 'रेशमाचे बंध' हे कशाचे वर्णन आहे ?

(1) जातीचे

(2) हृदयाचे

(3) धर्माचे

(4) प्रेमाचे

योग्य पर्याय निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

106. वाचन करत असतानाचे संकलन कौशल्य म्हणजे

(1) टिपणे काढणे

(2) विश्लेषण

(3) कूटप्रश्न सोडवणे

(4) महत्त्वाची टिपणे तयार करणे

107. श्रवण-भाषण कौशल्य चाचणीच्या वर्गात उडालेला हा खटका वाचा. प्रत्येक विद्यार्थ्यांचे मूल्यमापन तुम्ही कसे कराल ?

**शिक्षक :** तुझ्या आवडत्या खेळाविषयी तुझ्या मित्राशी बोल.

**विद्यार्थी 1 :** का ? आम्ही चर्चा नाही करू शकत ?

**विद्यार्थी 2 :** ठीक आहे. मग मी त्याच्याशी कबड्डी बद्दल बोलू का ?

(1) दुसऱ्या विद्यार्थ्यांचे बरोबर आहे. पहिल्या विद्यार्थ्याने आपला प्रतिसाद योग्य रीतीने दिला नाही.

(2) पहिल्या विद्यार्थ्यांचे बरोबर आहे. दुसऱ्या विद्यार्थ्याने बरोबर प्रतिसाद दिला नाही.

(3) पहिल्या आणि दुसऱ्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद बरोबर आहे.

(4) पहिल्या आणि दुसऱ्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद बरोबर नाही.

We are providing a piece of information. This may not be an Official One. T

108. संशोधनानुसार, मुलांना अखेर वाचनात यश मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानाची तयारी करण्यासाठी बालवाडीच्या विद्यार्थ्यांना देण्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची घरी करण्यासारखी कृती खालीलपैकी कोणती ?

(1) मुलांनी शिशुगीते म्हणणे

(2) कुटुंबाने शाळेबद्दल बोलणे

(3) पालकांनी मुलांना मोठयाने वाचून दाखवणे

(4) पालकांनी वर्णमाला शिकवणे

109. मोठ्याने वाचन करणारा विद्यार्थी छापलेल्या शब्दासाठी त्याच अर्थाचा दुसरा शब्द वापरतो तेव्हा शिक्षकाचा सर्वात उचित प्रतिसाद कोणता असेल ?

(1) विद्यार्थ्याला तो शब्द पुन्हा बरोबर वाचायला लावणे

(2) विद्यार्थ्याला वाचन चालू ठेवायला परवानगी देणे

(3) बरोबर शब्दाचा मोठ्याने उच्चार करून चुकीचा शब्द दुरुस्त करणे

(4) दोन्ही शब्द लिहून विद्यार्थ्याला उताऱ्यातून तो शब्द शोधायला सांगणे

110. आधीपासून अस्तित्वात असलेल्या शैलीचे अनुकरण करण्याच्या उलट, स्वत:च्या अस्सल शैलीत केलेले लेखन कोणत्या प्रकारचे असते ?

(1) कल्पित

(2) संवाद (नाटकासाठी)

(3) सर्जक

(4) पत्र

111. कोणत्या अध्ययन क्षेत्रात उच्च श्रेणीच्या विचारसरणीचा समावेश होतो ?

(1) स्मरण

(2) आकलन

(3) मूल्यमापन

(4) उपयोजना

112. एका विशिष्ट भाषकसमूहाकडून बोलली जाणारी विशिष्ट वाणी (Variety) म्हणजे

(1) आघात

(2) बोली

(3) बल

(4) सूर

113. पुढीलपैकी कोणते माध्यम सर्वात जास्त अध्ययन अनुभव देते ?

(1) दूरदर्शन, रेडिओ

(2) विशिष्ट उद्देशीय माध्यमे

(3) नमुने आणि तक्ते

(4) क्षेत्रसहली

114. चित्रपटगृहात तुमच्या मागे बसलेला माणूस मोबाईलवर बोलायला सुरुवात करतो. तुम्हाला त्याला बोलणे थांबवायला सांगायचे आहे. तुम्ही कशी विनंती कराल ?

(1) इतक्या मोठ्याने बोलणे थांबवा

(2) कृपया चित्रपटगृहात मोबाईल फोन वापरू नका.

(3) कृपया, तुम्ही मोबाईल वापरायचे टाळू शकत नाही का ?

(4) तुम्ही मोबाईल वापरणे थांबवू शकत नाही का ?

We are providing a piece of information. This may not be an Official One.

**115.** खालीलपैकी कोणते प्रवृत्त करणारे लिखाण असते ?

(1) कामाचे मूल्यमापन, संपादकाला पत्रे

(2) चरित्र, आत्मचरित्र

(3) ज्ञानकोशातले लेख/आकृत्या

(4) बातम्यांचे अहवाल, पाठ्यपुस्तके

**116.** विद्यार्थ्यांचे बोधनात्मकातीत (netacognitive) कौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षकाने वापरण्याचा सर्वात उत्तम मार्ग कोणता ?

(1) विद्यार्थ्यांना वाचनात मार्गदर्शन करण्यासाठी थोडे सारात्मक वाचनपूर्व प्रश्न देणे.

(2) वाचनासाठी निवडलेल्या उताऱ्यांचे आकलन होण्यासाठी आवश्यक असलेले नवीन शब्द त्यांना पाठ करायला लावणे.

(3) वाचन करत असताना स्वत:ला प्रश्न विचारण्याच्या पद्धतीचा पुरस्कार करणे व त्याचा नमुना देणे.

(4) विद्यार्थ्यांना एकमेकांसाठी आकलनप्रश्न लिहायची संधी उपलब्ध करून देणे.

**117.** विषय वाक्य (topic sentence) म्हणजे

(1) निबंधाची मुख्य कल्पना

(2) निबंधाचे किंवा कवितेचे शीर्षक

(3) परिच्छेदाची मुख्य कल्पना

(4) निबंधाचे किंवा दस्तावेजाचे उपशीर्षक

**118.** विद्यार्थ्याला जगावर प्रेम करण्यासाठी आणि शांततामय भविष्याची कल्पना करण्यासाठी उत्तेजन देणे, त्याची काळजी घेणे व त्याला इतरांची काळजी घ्यायला लावणे म्हणजे

(1) दूरशिक्षण

(2) शालेय आणि विद्यापीठीय शिक्षण

(3) व्यवसायाभिमुख शिक्षण

(4) मूल्यशिक्षण

**119.** उताऱ्यातील इतर शब्दांवरून अपरिचित शब्दांच्या अर्थाविषयी निष्कर्ष काढणे हे कोणते कौशल्य आहे ?

(1) श्रवण

(2) भाषण

(3) वाचन

(4) लेखन

**120.** जेव्हा तुम्ही वर्तमानपत्रातली विशिष्ट जाहिरात बारकाईने वाचता तेव्हा वापरलेले वाचनाचे तंत्र कोणते असते ?

(1) सखोल (intensive)

(2) क्रमवीक्षण (scanning)

(3) विस्तारित (extended)

(4) सारग्रहण (skimming)

We are providing a piece of information. This may not be an Official One.

परीक्षार्थींनी जर **भाषा** – II चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

We are providing a piece of information. This may not be an Official One. T

## भाग –V
## भाषा – II
## मराठी

पुढील उतारा वाचा आणि योग्य तो पर्याय निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

अमेरिकेत वॉल्ट व्हिटमन म्हणून एक उच्च दर्जाचा व स्वतंत्र प्रतिभेचा कवी गेल्या शतकात होऊन गेला, त्याने आपल्या काव्यसंग्रहास Leaves of the grass- 'तृणपर्ण' हे साधे नाव दिले आहे. वॉल्ट व्हिटमन याने आपल्या सुंदर व स्फूर्तिदायक कवितांस तृणपर्ण हे साधे नाव का बरे दिले ? एक दिवस मी पहाटे उठलो व मला वॉल्ट व्हिटमनच्या काव्याची आठवण झाली व त्या नावाचा मी विचार करू लागलो. तृणासंबंधी मी विचार करू लागलो- तो तो माझी मती गुंग होऊन गेली. लहानसे तृण परंतु महिमा थोर आहे असे मला दिसून येऊ लागले. वॉल्ट व्हिटमनने स्वत:च्या काव्यास तृणपर्ण हे नाव का दिले ते समजून आले.

तृण-गवत किती लहान व चिमुकले – तरी पण त्याचा महिमा मोठा आहे. तृण हे सर्व विश्वास गुरुस्थानी शोभण्यासारखे आहे. वर्षाऋतूस प्रारंभ झाला म्हणजे जेथे पूर्वी काहीही दिसत नव्हते. जेथे रखरखीत व उजाड भासत होते, ज्या जमिनीवर दृष्टी फेकली असता, ज्या पर्वतशिखरांकडे दृष्टी फेकली असता रखरखीतपणामुळे दिपल्यासारखे होई, तीच भूमी, तेच पर्वत, तीच डोंगराची अंगे-प्रत्यंगे किती सुंदर व रमणीय दिसू लागतात ! डोळ्यांस संतोषदायक अशी हिरवी नव्या नवाळीची मृदू लव सर्वत्र दिसू लागते. कोठेही चौफेर दृष्टी फेका. जेथे जेथे म्हणून जागा असेल तेथे तेथे तृण सर्वत्र उगवलेले असते. घराच्या कौलावर, दगडांच्या अंगावर, वृक्षांच्या स्कंधावरसुद्धा गवत उगवलेले दिसेल. या तृणास उगवण्यासाठी वाटेल ते ठिकाण चालेल. वाटेल त्या ठिकाणी ते आपली सोय करून घेते. अमुकच ठिकाणी मी वाढेन असे त्याला वाटत नाही. परिस्थितीचा प्रतिबंध तृणाला कधीच नसतो.

लहानसे-इवलेसे गवत ; पण मूठभर उंचीचे असले तरी सारी धरणी व्यापून टाकते. सर्व भूतलास आपल्या पायांनी त्याने आक्रांत करून सोडले आहे. लहान वस्तूतही ऐक्यामुळे व दृढ निश्चयाने पहा कसे सामर्थ्य उत्पन्न होते. एवढेसे गवत ! परंतु त्याने विस्तृत पृथ्वीस हिरव्या शालूने नटवली आहे. या तृणाने डोंगराच्या पाठीवर हिरव्या झुली घातल्या आहेत ; पर्वतांच्या माथ्यावर हिरवे मंदील बांधले आहेत.

कधी कधी ते तृण उंचही वाढते. वाऱ्याच्या झुळकेसरशी ते मंद डुलत असते. कबिराचा मुलगा कमाल हातात विळा घेऊन गवत कापण्यासाठी गेला असता या तृणाच्या मंद डोलण्यानेच तो कमाल मोहून गेला, प्रेमाचा धडा शिकला. त्या डोलणाऱ्या तृणाने माना हलवून कमालास सांगितले, "कापू नको, नको रे कापू." जरी या तृणाची प्रार्थना कोणी ऐकली नाही व त्याला कापले तरी ते कुरकूर करीत नाही. सारा देह या तृणाने परार्थच दिलेला असतो. मनुष्ये त्यास कापून काढतात, आगगाडीचे मालक त्यास आग लावतात, गुरे त्यावर चरतात व दातांनी कुरतडतात. परंतु ते तृण कुरकूर करीत नाही, उलट जरा पाऊस पडला; चार दंवाचे थेंब पडले तर ते पुन्हा वैभवाने वाढू लागते, डुलू लागते. तृणाचे हे वाढणे कोणासाठी आहे ? तृणाची हिरवी संपत्ती कोणासाठी आहे ? ते वैभव दुसऱ्यानेच लुटावे, त्या वैभवाने दुसऱ्याने संपन्न व्हावे, गाईगुरांनी पुष्ट व्हावे, दूध द्यावे, म्हणून आहे.

**121.** तृणाचे वैभव कोणासाठी आहे ?

(1) स्वत:साठी

(2) लेखकासाठी

(3) दुसऱ्याने संपन्न व्हावे यासाठी

(4) देशासाठी

We are providing a piece of information. This may not be an Official One. This might be useful for refere

**122.** तृणाने डोंगराच्या पाठीवर झुली घातल्या आहेत यात कोणता अलंकार आहे ?

(1) उपमा

(2) रूपक

(3) उत्प्रेक्षा

(4) स्वभावोक्ती

**123.** 'मृदू' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) कोमल

(2) मुलायम

(3) माती

(4) कठीण

**124.** परिस्थितीचा प्रतिबंध तृणाला नसतो म्हणजे परिस्थिती

(1) तृणाला अडवत नाही

(2) तृणाला वाढू देत नाही

(3) तृणाला कुंपण घालते

(4) तृणावर मात करते

**125.** कमाल कशाने मोहून गेला ?

(1) तृणाच्या सौंदर्याने

(2) तृणाच्या मंद डोलण्याने

(3) तृणाच्या हिरव्या रंगाने

(4) तृणाच्या मृदूपणाने

**126.** 'सोय' शब्दापासून बनलेले विशेषण कोणते ?

(1) सोयरा

(2) सोयीप्रमाणे

(3) सोयरिक

(4) सोयिस्कर

**127.** व्हिटमन यांच्या काव्यसंग्रहाच्या इंग्रजी नावाचे रूपांतर कोणते ?

(1) तृणपाती

(2) तृणपाने

(3) तृणपर्णे

(4) तृणपाते

**128.** तृणाने कोणती प्रार्थना केली ?

(1) कापू नको रे

(2) चिरडू नको रे

(3) तुडवू नको रे

(4) तोडू नको रे

**129.** 'तेच पर्वत किती सुंदर दिसू लागतात !' हे वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

(1) प्रश्नार्थक

(2) उद्गारवाचक

(3) विधानार्थी

(4) नकारार्थी

We are providing a piece of information. This may not be an Official One. Th